या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

पाटोदा PATODA SANCHAR

# संचार

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे




❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३४ वे, वर्ष १९ वे ❑ अंक २८५ वा ❑ सोमवार दि.२३ डिसेंबर २०२४ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एलएल/७६.बीड/२०२२-२४ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 19 th ❑ Issu -285 ❑ Monday 23 December 2024 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/76/Beed/2022-24 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

# राज्याची आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर! कॅगचा धक्कादायक अहवाल, वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता, अपुऱ्या सुविधा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील आरोग्य व्यवस्थाच व्हेंटिलेटरवर असल्याची धक्कादायक बाब भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि सेवा यावर आधारित सविस्तर कामगिरीविषयक लेखापरीक्षण अहवालातून उजेडात आली आहे. या अहवालात वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता, अपुरी सुविधा आणि महत्त्वाच्या आरोग्य प्रकल्पांमध्ये होणारा विलंब यावर नेमकेपणाने बोट ठेवण्यात आले आहे.

'कॅग'चा अहवाल शनिवारी विधानसभेत सादर करण्यात आला. २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीसाठी कॅग २०२४ अहवालाने मानवी संसाधने, औषधे, उपकरणे आणि आरोग्य सेवांची गुणवत्ता यांचे मूल्यमापन केले असून त्यावर तातडीने लक्ष देण्याची गरज असलेल्या अनेक मुद्द्यांचा उलगडा केला आहे.

**संस्थांवर कामाचा अतिरिक्त ताण**

भारतीय सार्वजनिक आरोग्य मानांकनाच्या शिफारशी लक्षात घेता, रुग्णसंख्या अधिक असल्याने महाराष्ट्रातील आरोग्य संस्थांवर कामाचा अतिरिक्त ताण आहे. त्यामुळे राज्याच्या मास्टरप्लॅनप्रमाणे सप्टेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करावयाचे नवीन आरोग्य संस्थांचे ७०% आणि नियोजित सुधारणांचे ९०% प्रकल्पसुद्धा अपूर्ण राहिले आहेत. यासंदर्भातील लक्षणीय उदाहरण म्हणजे, अमरावतीतील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलवर ३१.९१ कोटी खर्च होऊनही ते मागील तीन वर्षांपासून वापरात आलेले नाही. याशिवाय, ४३ आरोग्यविषयक प्रकल्प जमीन संपादनाअभावी रखडले आहेत. नागरिकांच्या वाढत्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेता, हे प्रकल्प प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याचे काम सरकारने हाती घ्यावेत, अशी सूचना राज्य सरकारला करण्यात आली आहे.

आरोग्य व्यवस्थेवरील खर्च वाढला असला तरी राज्याच्या अर्थसंकल्पात अपुऱ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. आरोग्यविषयक अर्थसंकल्पीय तरतुदी २०१६-१७ मध्ये १०, ७२३ कोटींवरून २०२१-२२ मध्ये २१, ०६७ कोटींवर गेल्या; परंतु प्रत्यक्ष खर्च राज्याच्या ढोबळ उत्पन्नाच्या

पान दोन वर

## आरोग्य कर्मचाऱ्यांची गंभीर कमतरता

'कॅग' च्या अहवालात महाराष्ट्राच्या आरोग्य कर्मचाऱ्यांची चिंताजनक कमतरता उघड झाली आहे. प्राथमिक आणि दुय्यम आरोग्य सेवांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टरांची २२%, नर्सची ३५% आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची २९% कमतरता आहे. महिला रुग्णालयांमध्येही हीच परिस्थिती असून, गरजेपेक्षा २३% कमी डॉक्टर आणि १९% कमी नर्स उपलब्ध आहेत. वैद्यकीय शिक्षण व औषध विभागातही डॉक्टरांची ३७%, नर्सची ३५% आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची ४४% कमतरता आहे.



## ३६ रुग्णालयांनी अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतलंच नाही

महाराष्ट्रात सरकारी रुग्णालयात आग लागण्याच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर सरकारनं काही महत्वाचे निर्देश दिले होते. मात्र, कॅगकडून तपासणी करण्यात आलेल्या अनेक रुग्णालयांमध्ये सुविधांचा अभाव दिसून आला. कॅगने ५० टक्के रुग्णालयांची तपासणी केली, या पैकी ३६ रुग्णालयांनी अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतलं नव्हतं. २२ रुग्णालयांनी धूर-शोधक यंत्र बसविलं नव्हतं. २० रुग्णालयांनी आगीची सूचना देणारी यंत्रणाच बसवली नव्हती. २१ रुग्णालयांत आग लागल्यास रुग्णांना त्वरित सुरक्षित स्थळी हलविण्यासाठीचा मार्गच दाखवण्यात आलेला नव्हता.

## कॅगच्या अहवालात आरोग्य विभागावर ताशेरे

अमरावती, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, जळगाव, पुणे, कोल्हापूर आणि नांदेडमधील रुग्णालयांनी विभागांच्या शिफारशींची पूर्तता केली नव्हती. मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था ही व्हेंटिलेटवर असल्याचं दिसून येतंय. हिंगोलीच्या आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात बेड नसल्यानं शस्त्रक्रिया झालेल्या ४३ महिलांवर भर थंडीत जमिनीवर झोपण्याची वेळ आली होती. तर बीड, धाराशीव, पुणे, नांदेडमध्ये बोगस औषधांचा पुरवठा करुन रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार देखील उघडकीस आला होता. आणि आता कॅगनं अहवाल सादर करत महाराष्ट्राच्या आरोग्य विभागावर ताशेरे ओढले आहेत.

# पोलिसांवरील विश्वास वाढविण्याचे काम करणार-पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

बीड । प्रतिनिधी

कायदा सर्वांना समान असून पोलिसांवरील विश्वास वाढविण्याचे काम आम्ही करणार असल्याचे ते म्हणाले. तसेच मस्साजोग प्रकरण असेल किंवा इतर घटनेतील आरोपींना तातडीने अटक करण्यासंदर्भात पाऊले उचलण्यात येणार असल्याची माहिती नव्याने पदभार घेतलेल्या पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

अविनाश बारगळ यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बदली केल्यानंतर शनिवारी रात्री १०.४० च्या सुमारास नवनीत कॉवत यांनी पदभार घेतला. त्यानंतर सकाळी पत्रकारांशी सवांद साधताना त्यांनी जिल्हा पोलीस दलाची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर त्यांनी बीड शहरातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी बीडमध्ये काम करण्यासाठी माझ्याकडून तुम्हाला पूर्ण सवलत राहिलं. चुकीची घटना घडल्यास कोणालाही सोडू नका. राजकीय दबावातून काही उलटसुलट निर्णय घेतला तर उद्या बळी तुमचाच जाईल असा इशाराही नूतन पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक



विश्वाभंर गोल्डे,उमेश कस्तूरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख,शितलकुमार बल्लाळ, मारूती खेडकर,शिवाजी बंटेवाड, अशोक मोदीराज, गात, डीएसबीचे इंगळे यांच्यासह इतर अधिकार्यांची उपस्थिती होती. उद्या गुन्हे आढावा बैठकीत नवनीत कॉवत जिल्ह्यातील प्रभारींना सूचना देणार आहेत.

बीडचा बिहार झाल्याचा आरोप होत आहे. याबाबत

पान दोन वर

## खोटी गुन्हे दाखल होणार नाहीत याची काळजी घ्या

पोलीस जनतेचे सेवक आहेत.'सदरक्षणाय, खलनिग्रहणाय...' असे ब्रीद पोलिसांच्या खाकी वर्दीवर लावलेले आहे. याचा अर्थ सामान्य जनतेला सुरक्षित ठेऊन 'खल'वृत्तीने वागणाऱ्यांना ठेचण्याचे काम पोलिसांनी करणे अपेक्षित आहे. तुमच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला खाकीचा विश्वास वाटला पाहिजे.अन्याय झाल्यास गुन्हे दाखल करा,खोटी गुन्हे दाखल होणार नाहीत याची काळजी घ्या. यासोबतच कोणत्याही नागरिकांकडून एक रुपयाही घेतल्यास त्याची माहिती मला आली तर मी कारवाई करेल असा इशाराच पोलीस अधिक्षकांनी अधिकाऱ्यांना आढावा बैठकीतून दिला आहे.

# आरोपी पुरावे नष्ट करतील, आम्ही 'हे' पाऊल उचलणार; बीड प्रकरणात अंबादास दानवेंची घोषणा

**नागपूर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण ढवळून निघालं आहे. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान हा मुद्दा प्रचंड गाजला आणि सरकारची कोंडी झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन सादर करत बीडच्या पोलीस अधीक्षकांची बदली केली. तसंच



देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल, असं सांगितलं. मात्र हत्येच्या घटनेला १३ दिवस उलटून गेल्यानंतरही तीन आरोपी अजूनही फरार आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आरोपी पुरावे नष्ट करतील, अशी भीती व्यक्त करत आम्ही याप्रकरणी आम्ही मुंबई उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठात Criminal Writ Petition

पान दोन वर

# निराधारांना मिळणार संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचा लाभ

## आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.

निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल

पान दोन वर

# बस-दुचाकीच्या अपघातात शिक्षकाचा जागीच मृत्यु

**बीड । प्रतिनिधी**

भरधाव वेगाने जाणाऱ्या एसटी बसने दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वाराला दुचाकीसह बसने जवळपास २०० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले होते. यात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाचा जागीच मृत्यु झाला आहे. अपघात झाल्यानंतर महामार्गावर नागरिकांची गर्दी जमली होती.

गेवराई- शेवगाव राज्य महामार्गावरील महार टाकळी येथे सदरची दुर्दैवी घटना आज (दि.२२) रोजी घडली. या अपघातात महारटाकळी (ता. गेवराई) येथील फय्याज खान (वय ४५) असे मृत शिक्षकाचे नाव आहे. फैय्याज खान हे अर्ध पिंपरी याठिकाणी जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते. ते आपल्या

पान दोन वर

# मी माझी जबाबदारी चोखपणे पार पाडून...; खातेवाटप होताच मंत्री धनंजय मुंडे म्हणाले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडल्यानंतर आठवड्याभराने काल शनिवारी खातेवाटप जाहीर करण्यात आले. यामध्ये बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर वादात सापडलेले राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली. या जबाबदारीची घोषणा झाल्यानंतर धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले आणि राज्यातील जनतेला आपण दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडू, अशा शब्दांत आश्वस्त केलं आहे.

धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहीत म्हटलं आहे की, राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयाची

पान दोन वर



# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

## आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सामूहिक बैठक

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.




मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग

पान दोन वर

# पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी; एसपींनी गुन्हेगारी रोखावी-ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गुंडगिरी फोफावत आहे. या गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत.पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या काचा असलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत आणि अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे एस. पी. नवनीत कावत यांनी याबाबत त्वरित आदेश द्यावेत. गुन्हेगारीवर रोख आणावी, असे आवाहन जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

जिल्ह्यातील गुन्हेगार पोलिसांना माहीत आहेत. याच सलोख्याने वाळू माफिया, गुटखा माफिया, खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. हे सर्व गुन्हेगार काळया काचाच्या गाडीतून फिरतात. डिजिटल नंबर प्लेट गाड्यांना लावतात. त्यामुळे पोलिसांनी बेकायदेशीर रीतीने चालणाऱ्या या गाड्यांवर कठोर कारवाई करावी.

वाहनांवर कारवाई करत असताना ड्रायव्हरचे लायसन देखील



निलंबित करावे. गुन्हेगारांमार्फत दहशतीचे वातावरण पसरवले जात असून याला अनेक जण कारणीभूत आहेत. यातून बीड जिल्ह्यात व्यवसाय निमित्त कोणीही येण्यास तयार नाही.

जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असून हे कुठेतरी रोखणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या पद्धतीने पाऊले उचलून जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांने पुढे येणे आवश्यक आहे.

मस्साजोग येथे आज भेट दिल्यानंतर जी परिस्थिती तिथे दिसली, त्यावरून विदारक चित्र निर्माण होत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर वाळू माफिया, गुटखा माफिया खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. प्रशासनातील अनेक लोक हप्तेखोरी मुळे या लोकांबरोबर जोडले गेले आहेत. समाजासाठी ही बाब विघातक आहे.

हे सर्व रोखण्यासाठी आज समाजातील दक्ष नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. बीड जिल्हा बिहार झाल्याचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. येथील गुंडगिरी देखील त्याचप्रमाणे आहे. नवीन एसपी काय करतात, याकडे देखील जनतेचे लक्ष लागले आहे, असेही ड. देशमुख यांनी म्हटले आहे.

संचार

# ‘एक देश, एक निवडणूक’

‘एक देश, एक निवडणूक’ याबाबतचे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. आता ते अधिक विचारार्थ संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विधेयक मांडण्यापूर्वी लोकसभेमध्ये या विषयावर गरमागरम चर्चाही झाली. तरीही सरकारने हे विधेयक लोकसभेच्या पटलावर मांडले. संसदीय शिष्टाचाराप्रमाणे जेव्हा लोकसभेसमोर आलेल्या एखाद्या विषयावर अधिक चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्यात येते तेव्हा त्यामध्ये राजकीय पक्षांना त्यांच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाते. ठराविक कालावधीमध्येच म्हणजेच ९० दिवसांत संयुक्त संसदीय समितीला आपला अहवाल सादर करावा लागतो.

लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये भाजपचे बहुमत असल्याने या संसदीय समितीवर भाजपचाच वरचष्मा असणार. संसदीय समितीचा अहवाल काय असेल याबाबत जरी अंदाज व्यक्त करता येत असला तरी या विषयामध्ये व्यावहारिकता तपासण्याचीही गरज आहे. देशाची निवडणूक आयोग यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणांवरील दबाव कमी करण्याच्या उद्देशाने आणि देशात सतत कोठे ना कोठे निवडणुका होत असल्याने आचारसंहितेचा फटका विकास प्रक्रियेला बसत असल्याने देशात एकाच वेळी सर्व निवडणुका घ्याव्यात, अशा प्रकारचा युक्तिवाद हे विधेयक मांडताना आणि त्यापूर्वीही करण्यात येत होता. पण भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशामध्ये एकाच वेळी लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांची विधानसभा निवडणूक घेणे शक्य आहे का, याबाबत ग्राउंड रिएलिटीसुद्धा तपासून बघण्याची गरज आहे. देशात काही महिन्यांपूर्वी जेव्हा लोकसभेची निवडणूक झाली तेव्हा त्या निवडणुकीसोबत देशातील चार राज्यांची विधानसभा निवडणूक झाली होती. त्यानंतर पाच-सहा महिन्यांनी महाराष्ट्र आणि इतर दोन-तीन राज्यांची विधानसभा निवडणूक झाली. आता २०२५च्या पूर्वार्धात दिल्लीसारख्या काही राज्यांची निवडणूक होईल आणि नंतरच्या कालावधीमध्ये सातत्याने कोणत्या ना कोणत्या राज्यामध्ये विधानसभा निवडणुका घेतल्या जातील. म्हणजे जर तत्त्वतः विचार करायचा झाल्यास लोकसभेसोबत फक्त देशातील चार राज्यांची मुदत संपत आहे. उर्वरित राज्यांची मुदत संपण्यापूर्वीच त्यांना लोकसभेसोबत निवडणुकीच्या मैदानात उतरवावे लागेल, तर काही राज्यांची मुदत संपल्यानंतर त्या राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट जारी करून ‘एक देश एक निवडणुकी’चा अट्टहास पूर्ण करावा लागेल. ही संपूर्ण प्रक्रिया त्रासदायक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही निवडणुकीमध्ये जे मतदारांच्या मनस्थितीचे महत्त्वाचे तत्त्व आहे त्यालाच ह्या विषयामुळे बाधा पोहोचू शकते.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतामध्ये गेल्या ७५ वर्षांच्या कालावधीमध्ये झालेल्या लोकसभा निवडणुका असो किंवा विविध राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका असोत त्या ठिकाणी मतदारांनी विविध प्रकारचे कौल देऊन काही राजकीय पक्षांना सत्ताधारी करण्याची किंवा काही पक्षांना विरोधी बाकावर बसण्याची वेळ आणली आहे.

बदलत्या परिस्थितीप्रमाणे मतदारसुद्धा आपला कौल बदलत असल्यानेच लोकशाहीमध्ये सत्तांतर होण्याचा जिवंतपणा कायम राहू शकतो. सर्व निवडणुका एकदम घेत असताना हा जिवंतपणाही कमी होण्याचा धोका आहे. कारण एकाच वेळी सर्व निवडणूक होत असताना सामाजिक परिस्थिती आणि मतदारांची मनःस्थिती समान राहू शकते. मतदारांचा कौलही समान राहू शकतो. निवडणुकीतील गंमत त्यामुळे कमी होऊ शकते. साहजिकच हा विषय संयुक्त संसदीय समितीकडे पाठवला ते बरे झाले.

कारण, आता नजीकच्या कालावधीमध्ये या निमित्ताने केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य पातळीवरील निवडणूक आयोग, त्या त्या राज्यांमधील प्रमुख राजकीय पक्ष आणि तेथील विधानसभांचे सभापती आणि सर्वसामान्यांना नागरिक यांच्याशी चर्चा करून ही संकल्पना खरोखरच व्यवहार्य आहे का, याबाबत निष्कर्ष काढावा लागणार आहे. केवळ अट्टहास करून अशा प्रकारच्या कल्पना पुढे रेटून काहीच साध्य होणार नाही.

# सुट्यांचे नियोजन करताना....!

आजमितीला शहरासारख्या ठिकाणी अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यम आणि कॉन्व्हेंट शाळांत घालत असल्याने या शाळांतील विद्यार्थ्यांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी अशी मोठी सुट्टी मिळते. वर्षअखेर असल्याने शिल्लक सुट्या संपवायच्या हेतूने नोकरी करणारे पालक सुद्धा या कालावधीत सुट्या घेऊन सहलीचा प्लान करतात. यानिमित्ताने पर्यटन तर होतेच शिवाय नेहमीच्या धकाधकीच्या जीवनाला बाजूला करून वेगळे जीवन जगताना कुटुंबासाठीही वेळ दिला जातो. या मिळालेल्या सुट्टीचा उपयोग अनेकदा पालक केवळ मौजमजेसाठी करताना दिसतात त्यासाठी रिसॉर्ट, वॉटर पार्क किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा बेत आखला जातो. ज्यांच्या घरात शाळकरी मुले आहेत अशांनी सुट्यांचे नियोजन करताना पर्यटनासोबत मुलांच्या ज्ञानात कसा भर पडेल आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांना शिक्षणातही कसा होईल याचाही विचार करायला हवा.





आपल्या अद्वितीय पराक्रमाने, इच्छाशक्तीने आणि चातुर्याने इतिहास घडवणारे भारतातील महापराक्रमी राजे-महाराजे इतिहासाच्या पुस्तकातून मुलांना ज्ञात होतात. त्यांच्या पराक्रमांची साक्ष देणारे गड, दुर्ग, किल्ले यांची माहिती मिळते; मात्र ते जवळून अनुभवण्यासाठी, त्यांच्या पराक्रमाच्या आणि बलिदानाच्या खुणा डोळ्यांनी पाहण्यासाठी, त्यांचे अद्वितीय शौर्य प्रत्यक्ष न्याहाळण्यासाठी मुलांना अशा ठिकाणी घेऊन जाण्यासाठी हीच नामी संधी असते. त्यादृष्टीने गड-किल्ले दर्शनाचा समावेश सुट्यांच्या नियोजनात करायला हवा. महाराष्ट्र ही साधू संतांची भूमी आहे.व्यवहार करताना परमार्थ कसा करावा याची शिकवण देऊन जीवनाचा उद्धार करण्याचा मूलमंत्र देणारी कितीतरी संत महंत मंडळी, अवतारी पूरूष महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांच्या वास्तव्याने आणि सहवासाने पुलकित झालेली अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत. एरव्हीच्या धकाधकीच्या जीवनातून काहीकाळ बाजूला काढताना या चैतन्यमय ठिकाणी मुलांना घेऊन जाऊन त्यांच्यासह स्वतःही तेथील सात्त्विकतेचा लाभ घ्यायला हवा. महाराष्ट्रभूमी जशी साधुसंतांची भूमी आहे तशी अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अध्यात्मिक भूमी म्हणूनही महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे. अष्टविनायक, विविध शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग या भूमीत वसली आहेत. या प्रत्येक क्षेत्राचा एक वेगळा इतिहास आहे.

दूरचित्रवाहिनींवरील मालिका, ग्रंथ आणि इंटरनेट आदींच्या माध्यमातून आपण तो जाणून घेतलेला असतो. हा इतिहास जवळून जाणून घेण्यासाठी आणि तेथील चैतन्य आणि शक्ती अनुभवण्यासाठी अशा ठिकाणी कुटुंबासह जायला हवे. याशिवाय स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, विचारवंत, समाज सुधारक यांच्या स्मारकांना भेट देऊन त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी मिळालेल्या सुट्टीचा उपयोग करता येईल. यंदाच्या ख्रिसमस व्हॅकेशनच्या सुट्ट्यांचे नियोजन करताना पालकांनी या गोष्टीही ध्यानात घेऊया !



**जगन घाणेकर**
घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

# तरुणांना संधी द्यायची होती तर मला उभं का केले? भुजबळांचा अजित पवारांना सवाल



मुंबई । प्रतिनिधी

तरुणांना संधी द्यायची होती. त्यामुळे काही निर्णय घ्यावे लागले. अशा स्थिती कोणी वेगळा अर्थ काढू नये, असे वक्तव्य अजित पवारांनी केले होते. त्याला छगन भुजबळांनी प्रत्युत्तर दिले आहे. जर तरुणांना संधी द्यायची होती तर मला निवडणूक लढवायला का सांगितली? असा प्रश्नही भुजबळांनी उपस्थित केला. शिवाय तरुणांची व्याख्या काय? ६७ आणि ६८ वर्षाचे आहेत ते पण तरुण म्हणायचे का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी थेट अजित पवारांच्या मंत्रिपदावरच अप्रत्यक्षपणे आक्षेप नोंदवला.

राज्यभरातील ओबीसी नेत्यांबरोबर छगन भुजबळ यांची आज बैठक पार पडली. या बैठकीनंतर छगन भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधत पुन्हा एकदा अजित पवार यांच्यावर नाराजी व्यक्त केली. भुजबळ म्हणाले, आपण पक्षाला या आधीच सांगितले होते. आपल्याला लोकसभेत पाठवा. लोकसभेची सर्व तयारीही केली होती. पण तिथेही आपल्याला थांबवण्यात आले.

राज्यसभेच्या दोन निवडणुका झाल्या. पण दिल्ली ऐवजी तुमची गरज राज्यात आहे, असे सांगितले गेले. असे असताना आता ताबडतोब गरज कमी झाली का? अशी विचारणा त्यांनी केली. आता सांगितले जात आहे तुम्ही राज्यसभेत जा. राज्यसभेत जा म्हणजे विधानसभेचा राजीनामा द्या. पण मी राजीनामा का देऊ, असेही भुजबळ म्हणाले. आधीच आपल्याला याबाबत कल्पना का देण्यात आली नाही, असेही ते म्हणाले.

आज ओबीसी नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीनंतर मला त्यांनी सांगितले की असे कसे होऊ शकते? तुम्ही राज्याचे ओबीसींचे नेतृत्व करता. ओबीसींच्या प्रश्नांसाठी तुम्ही राज्यात आणि विधानसभेत प्रश्न मांडले. आता तुम्हाला मंत्रिमंडळातून बाहेर ठेवले, याचा अर्थ यामागे काहीतरी गौडबंगाल आहे. कारण तुम्ही नेहमीच ओबीसींच्या मुद्यांची पाठराखण केली आहे. त्यामुळे आम्हाला भिती वाटते की हे वेगळे काहीतरी आहे. त्यामुळे आम्ही तुमच्याबरोबर आहोत. आता पुढे काय करायचं? ते आपण बसवून ठरवा, असे ओबीसी नेत्यांनी सांगितले असल्याचेही त्यांनी सांगितले.

पान १ वरुन

## राज्याची आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर!

०.६६ टक्केच आहे.

**अर्थनियोजन सुधारा**

शहरी आरोग्य अभियानांतर्गत आर्थिक वर्षासाठी दिलेल्या निधीपैकी ७६ टक्के निधीही वापराविना पडून राहिल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले आहे. त्यामुळे अर्थनियोजन सुधारावे व ऐनवेळी निधी खर्च करण्याचे टाळण्यासाठी निधीचा योग्यरीत्या वापर करावा, अशी अपेक्षा कॅगच्या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

**औषधे व उपकरणांच्या खरेदीत अडचणी**

औषधे व उपकरणांच्या खरेदी व वितरणात कमतरता आढळल्या आहेत. वितरणात होणाऱ्या विलंबामुळे आरोग्य सेवा प्रभावित झाल्या आहेत. २०१६-१७ ते २०२१-२२ या काळात २,०५२ कोटी रुपयांचा निधी वापराविनाच राहिला. त्याचा फटका औषधे खरेदी करणाऱ्या हाफकीनसारख्या संस्थांना बसला आहे. अपुऱ्या साठवण व्यवस्थेमुळे अत्यावश्यक औषधांचा साठा वाया गेला असल्याच्या मुद्द्याकडे कॅगने लक्ष वेधले आहे.

**खासगी आरोग्य व्यवस्थेवर नियमनाचा अभाव**

कॅगच्या अहवालानुसार, महाराष्ट्राने अजूनही २०१० चा क्लिनिकल ॲस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू केलेला नाही, ज्यामुळे खासगी रुग्णालये आणि क्लिनिक अनियमित आहेत. यामुळे रुग्णांच्या शोषणाची शक्यता वाढते.

**पर्यावरणीय चिंता**

जैव-वैद्यकीय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन न झाल्यामुळे पर्यावरण आणि आरोग्य धोक्यात आहे. आरोग्य संस्थांमध्ये अन्नसुरक्षा आणि अग्निशमन यंत्रणा याबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अनेक रुग्णालयांमध्ये रुग्णकेंद्रित आहार दिला जात नाही आणि कंत्राटदाराने पुरविलेल्या अन्नाची चाचणीही केली जात नाही. अग्निशमन आणि वीज सुरक्षा मापदंडही अनेक ठिकाणी पाळण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रुग्णांसमवेतच कर्मचाऱ्यांसमोरही धोकादायक स्थिती आहे. खरेदीची प्रकिया सुनियोजित पद्धतीने व्हावी आणि आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय उपकरणे आणि औषधे वेळेत पोहोचतील याची खातरजमा करावी, अशी शिफारस कॅगने केली आहे.

## पोलिसांवरील विश्वास वाढविण्याचे काम

पत्रकारांनी प्रश्न विचारताच नवनीत कावत म्हणाले की, वैयक्तिकरीत्या मी या गोष्टीशी सहमत नाही. कारण मी मानतो की, हे दोन्ही भारताचेच भाग आहेत. माझं लक्ष्य आहे की, जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारली पाहिजे. लोकांचा पोलिसांवरील विश्वास वाढेल, यादृष्टीने काम केलं जाईल , असं काँवत म्हणाले.

**.... तर मी थेट कारवाई**

आढावा बैठकीत बोलताना पोलीस अधिक्षकांनी 'अधिकाऱ्यांनी माझ्याबद्दल माहिती घेतली असेलच.मी आतापर्यंत एका रुपयाही अवैध मार्गाने घेतलेला नाही असा माझा स्वभाव आहे.'पोलिसांनी पोलिसांचे काम करावे.त्यामुळे कोणतेही अवैध धंदे मला चाललेले जमणार नाहीत.त्याची माहिती जर मला आली तर मी थेट कारवाई करेल अशा इशारा देखील त्यांनी आजच्या आढावा बैठकीतून अधिकाऱ्यांना दिला आहे.

## आरोपी पुरावे नष्ट करतील,

दाखल करणार आहोत, अशी माहिती दिली आहे.

अंबादास दानवे म्हणाले की, १३ दिवस उलटले तरी सरपंच संतोष देशमुख यांचे हत्यारे मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह इतर आरोपी फरार आहे. जर गृह खाते अशा प्रकारे निष्काळजीपणा करून दोषी आरोपी मोकाट फिरत असतील तर याविरुद्ध आम्ही दाद मागण्यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठात Criminal Writ Petition दाखल करणार आहोत, असं दानवे यांनी सांगितलं.

दरम्यान, आरोपी एवढे दिवस फरार असल्याने पुरावे ते सहज नष्ट करतील यात शंका नाही आणि उद्या कारवाई झाली तरी पुराव्यांअभावी ते दुसऱ्या दिवशी बाहेर असतील, असा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे.

**सुदर्शन घुले, वाल्मिक कराडला अटक नाही!**

मस्साजोग हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड यांना पोलिसांनी अद्यापही अटक केलेली नाही. त्यामुळे अधिवेशनात विरोधकांसह सत्ताधाऱ्यांनी आवाज उठवला. पोलीस अधीक्षक बारगळ यांनीही या प्रकरणाला सुरुवातीपासून गांभीर्याने घेतले नाही. आरोपी अटकेची सर्व जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेवर दिली. या शाखेनेही त्यांना अटक केली नाही. त्यामुळेच बारगळ यांच्याविरोधात रोष वाढत गेला. एलसीबीवरच अवलंबून न राहता जिल्ह्यातील नेटवर्क असलेल्या इतर पोलिसांची मदत घेतली असती, तर हे आरोपी अटक झाले असते. मात्र बारगळ यांनी तसे केले नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांकडून त्यांच्या बदलीचे आदेश देण्यात आले.

## निराधारांना मिळणार संजय

घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बर्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील ७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## बस-दुचाकीच्या अपघातात

गावालगत असलेल्या क्रिकेट मैदानावर रोज सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी जात होते. दरम्यान नेहमीप्रमाणे आज देखील सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते. क्रिकेट खेळून झाल्यानंतर ते घराकडे निघाले होते. याच वेळी समोरून भरधाव वेगाने आलेल्या माजलगाव- पुणे या राज्य परिवहन महामंडळाच्या बसने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात शिक्षक फय्याज खान जागीच ठार झाले. अपघाताची माहिती मिळताच चकलांबा पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. घटनेचा पंचनामा करून मृतदेह रुग्णालयात नेण्यात आला.

## मी माझी जबाबदारी चोखपणे पार पाडून...;

जबाबदारी माझ्यावर सोपवल्याबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री आदरणीय एकनाथराव शिंदे साहेब, उपमुख्यंत्री तथा आमचे नेते आदरणीय अजितदादा पवार साहेब, आमचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय खा. सुनीलजी तटकरे साहेब, ज्येष्ठ नेते आदरणीय प्रफुल्ल भाई पटेल यांसह सर्व पक्षश्रेष्ठींचे मनापासून आभार व्यक्त करतो. राज्यातील जनतेशी थेट निगडित हे खाते असल्याने मी माझी जबाबदारी चोखपणे पार पाडून माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरवून दाखवेन, असा विश्वास मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

## स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी

जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान चार वरुन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.पंकजाताई

अडीअडचणी सोडविण्यासाठी नव्या उमेदीने प्रयत्न करु.

कार्यक्रमास विकी शेकडे,विठ्ठलराव बनसोडे,युवा नेते अभयराजे धोंडे, राजपाल शेंडगे, लाभेश गाडेकर, दिलीपराव काळे, रावसाहेब लोखंडे, रघुनाथ शिंदे, बाबुराव कदम, पांडुरंग गावडे,चेअरमन राजेश धोंडे, आस्ताक शेख,ह.भ.प. पांडुरंग कर्डिले, हादी शेख,विष्णू कराळे, अंकुश मुंढे,माजी जि.प. सदस्य सतिश झगडे,शेख अन्सारभाई, राजेंद्र खाडे, मतीन भाई शेख,संजय कांकरिया, सरपंच ज्ञानदेव केदार, युवराज खटके, चंद्रशेखर साके,माजी पं.स.सदस्य संजय धायगुडे,सरपंच संजय विधाते,चेअरमन बाळासाहेब शिंदे, गौतम ससाणे,गौतम सावंत, दादा विधाते, हरिचंद्र बोडखे, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी शेख,विठ्ठलराव लांडगे, गणेश सिरसाठ, सरपंच माऊली वाघ,कृष्णा गोल्हार,आजिनाथ गवळी,कुंडलिक आस्वर, आण्णासाहेब लांबडे, अभय गर्जे, इंजि.एन.एम.बडे,सरपंच भरत जाधव,शहादेव खेडकर, लिंबराज कर्डीले, सुधीर ढोबळे, अमर माळी,वैभव बडे,विकास वनवे, रामदास गिते,चेअरमन शाम सांगळे,माजी सभापती अनिल जायभाय, दादासाहेब विधाते,नईम शेख,परमेश्वर खेडकर,सरपंच विष्णू दहिफळे,संजय मिसाळ'अस्लम बेग यांच्यासह आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी गौतम ससाणे, दादासाहेब विधाते,दिलीप काळे, अशोक बेद्रे,सरपंच संजय विधाते, याशिनभाई शेख,बबन सांगळे, कृष्णा गोल्हार,अशोक साळवे, नियामत बेग,रामदास बडे,रावराव खेडकर ,राजपाल शेंडगे यांची भाषणे झाली. सुत्रसंचलन निलेश दिवटे, प्राचार्य बाळासाहेब खेमकर तर आभार सईद चाऊस यांनी मानले.

## जीवने साहेब राजस्थानच्या प्रशिक्षण

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. याशिवाय ज्या तालुक्यात हे प्रशिक्षण चालू आहे त्या तालुक्यामध्ये मॉनिटरिंग करण्याची जबाबदारी तालुक्याचे गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांची आहे. मात्र कोट्यावधी रुपये खर्च करून ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करणाऱ्या या प्रशिक्षणाचे गांभीर्य कोणालाच असल्याचे दिसत नाही. थातूरमातूर प्रशिक्षण देऊन आणि बोगस सह्या करून या प्रशिक्षणासाठी शासनाकडून कोट्यावधी रुपयाचा मलिदा लाटला जात आहे. याकडे लक्ष देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची आहे. याचा निधी राज्यस्तरावर असला तरी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिप्राया शिवाय हा निधी संस्थेला मिळत नाही. हे तितकेच खरे त्यामुळे सर्वात जास्त जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची आहे. मात्र या प्रशिक्षणाकडे सपशेल दुर्लक्ष होत आहे. राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीफ सोसायटीने गेल्या काही दिवसाचे प्रशिक्षण घेतले त्यासाठी यशदाचे प्रशिक्षित प्रशिक्षक नेमणे गरजेचे असताना आणि हे प्रशिक्षक जिल्ह्यातीलच असावेत असे अध्यादेश असतानाही या संस्थेने बाहेरील लोक आणून प्रशिक्षण घेतले. जिल्ह्यामध्ये यशदाचे प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र त्यांना जाणीवपूर्वक डावलून थातूरमातूर प्रशिक्षण घेऊन कोट्यावधी रुपये लाटण्याच्या नादामध्ये या संस्थेने बाहेरचे लोक आणले. हे सर्व प्रशिक्षण नियमबाह्य असून ज्यांना हे प्रशिक्षण द्यायचे आहे त्यांनाही व्यवस्थित निरोप दिले जात नाहीत. कमीत कमी लोक या प्रशिक्षणाला यावेत अशी व्यवस्था या संस्थेने करून ठेवली आहे. या संस्थेचे जिल्ह्यातील काही दलाल संस्थेसाठी काम करत असून स्वतःच्या फायद्यासाठी जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे. आता यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन ही संस्था हद्दपार करावी अशी मागणी जिल्ह्यातील नागरिकांतून होत आहे.

# लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी सोमवारी परभणी दौऱ्यावर

## सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांची भेट घेणार

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी उद्या सोमवारी परभणीच्या दौ-यावर आहेत. परभणी दौ-यात राहुल गांधी हे सोमनाथ सुर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांना भेटणार आहेत. सकाळी १२.३० वाजता राहुल गांधी यांचे विशेष विमानाने नांदेड येथे आगमन होईल, नांदेडहून ते मोटारीने परभणीला जातील. दुपारी २.१५ ते ३.१५ वाजता ते सोमनाथ सुर्यवंशी कुटुंबियांची भेट घेतील व त्यानंतर विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांना भेटणार आहेत. या दोन कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर राहुल गांधी नांदेडकडे प्रयाण करतील व संध्याकाळी ५.१५ वाजता विमानाने दिल्लीला जातील.



यावेळी महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. विजय वडेट्टीवार, आ. अमित देशमुख, खा. रविंद्र चव्हाण, खा. डॉ. कल्याण काळे, डॉ. शिवाजी काळगे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुरेश वरपुडकर, एस. सी. विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

परभणीत संविधानाची विटंबना झाल्यानंतर पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करत लोकांना अमानुष मारहाण केली व निरपराध लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून अटक केली. सोमनाथ सुर्यवंशी या तरुणालाही अटक केली होती त्यांचा कोठडीत मृत्यू झाला. या प्रकरणात शांतता प्रस्थापित करत असताना विजय वाकोडे या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता.

# सरकारने जनतेच्या तोंडाला पाने पुसली, विदर्भ व मराठवाड्याच्या प्रश्नांवर अधिवेशनात चर्चा नाही–नाना पटोले

नागपूर । प्रतिनिधी

विदर्भ व मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी हिवाळी अधिवेशनात चर्चा होणे अपेक्षित होते पण अशी कोणतीच चर्चा झाली नाही. मविआ सरकार असताना याच अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती पण भाजपा युती सरकारने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन देऊनही कर्जमाफीची घोषणा केली नाही. गडचिरोलीत विपुल खनिज संपत्ती आहे ती लाडका उद्योगपती लुटत आहे. धारावी प्रकल्प अदानीलाच देण्याचा निर्णय सरकारने केला आहे. अधिवेशनातून सरकारने जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. भाजपा युती सरकार हे गरीब, तरुण, शेतकऱ्यांचे नाही तर मुठभर श्रीमंताचे आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

हिवाळी अधिवेशनाचे सुप वाजल्यानंतर महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले यांनी सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, बीड व परभणीतील घटना माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत, सरकारने गुंडगिरी पोसल्याचे परिणाम बीडमध्येही दिसले. पोलीसांमध्येही गुंडाराज आले आहे का? असा प्रश्न पडतो. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन केले, त्यात अनेकांना जबर मारहाण केली, सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस मारहाणीत झाला पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांचा बचाव केला. परभणी प्रकरणात फक्त एका पोलीस अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. निष्णात वकिलाप्रमाणे



मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरणात एका मंत्र्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आपली खूर्ची वाचवण्यासाठी मित्रपक्षांच्या मंत्र्यांना घाबरतात असे दिसते.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यावेळी म्हणाले की, सरकारने अधिवेशनात मागील काळातीलच काही योजना सांगितल्या, विदर्भाच्या वाट्याला काहीही मिळाले नाही. कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत बिघडलेली आहे. बीड प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड अजून फरार आहे, त्याला कोणाचा पाठिंबा आहे ते सर्वांना माहिती आहे. परभणी घटनेत पोलिसांच्या लाठीमारात सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला, कल्याणमध्ये मराठी माणसावर अन्याय करणारी घटना घडली.

पुरवणी मागण्या या फक्त खर्चासाठी होत्या विकासासाठी यात एका पैशाचीही तरतूद नाही. विदर्भ व मराठवाड्यातील काही सिंचन प्रकल्पावर मुख्यमंत्री बोलले पण त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. कांदा निर्यात मुल्य २० टक्के हटवण्यावर निर्णय नाही. शेतकऱ्यासाठी काहीच नाही. अनुदानही दिले नाही. ईव्हीएम सरकारने जनतेला न्याय दिला नाही. विरोधी पक्ष म्हणून सरकारला अधिवेशनात जाब विचारला यापुढेही मजबुतीने सरकारला जाब विचारत राहू असेही अंबादास दानवे म्हणाले.

या पत्रकार परिषदेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना आमदार सचिन अहिर, सुनिल प्रभू आदी उपस्थित होते.

लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सोमवारी परभणीला भेट देणार आहेत. पोलीस लाठीमारात मृत्यू झालेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाला ते भेट देणार आहेत, अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.

# राज्यात वाळू माफियांना पायबंद घालू, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

नागपूर । प्रतिनिधी

जनतेसाठी त्रासदायक ठरलेल्या महाराष्ट्रातील वाळू माफियागिरीला पायबंद घालण्यासाठी सरकार विशेष लक्ष देईल. वाळू विषयक सुलभ धोरण आणू, अशी घोषणा राज्याचे नवनियुक्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. जनतेला वाळू सहज उपलब्ध होईल, असं सुलभ धोरण देशातील कोणत्या राज्यात आहे, त्यासंदर्भात अभ्यास करून महाराष्ट्रात वाळूविषयक सुलभ धोरण अस्तित्वात आणू, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत.

महसूल विभागामुळं जनतेला त्रास होतोय, हे मी पाहू शकत नाही. 'जनता सर्वोपरी' असं आपलं कामकाजाचं धोरण राहणार असून देशातील सर्वात चांगला महसूल विभाग महाराष्ट्राचा असेल अशी ओळख मी निर्माण करेन, असा निर्धार बावनकुळे यांनी व्यक्त केला.

**झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न मार्गी लावणार**

राज्यात सुमारे ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न प्रलंबित आहे. यामुळं अनेक विकास प्रकल्प रखडले आहेत. या जमिनी प्रामुख्यानं विदर्भात अधिक असून, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला चालू आहे. या खटल्याच्या बाबतीत न्यायालयात पाठपुरावा करून, हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार, असंही बावनकुळे यांनी सांगितलं.



**जनतेचे हेलपाटे कमी करू**

शेतकरी-शेतमजुरांशी संबंधित असणाऱ्या या खात्यात अनेक कायद्यांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून राज्याच्या विकासाची गती वाढविण्यात येईल. कागदपत्रांशी निगडित नागरिकांची महसूल खात्याशी संबंधित अनेक कामं असतात. नागरिकांना या कामांसाठी तलाठी कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय ते शासनस्तरापर्यंत कमीत कमी हेलपाटे मारून काम कसं करता येईल, यासंबंधी लवकरच उपाययोजना आखू आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा देऊ. मुद्रांक शुल्क, जमाबंदी आयुक्त तसंच वाळूशी संबंधित धोरणांमध्ये सुलभीकरण करण्याचा तसंच वाळूमाफियांना पूर्णपणे पायबंद घालण्याचा माझा प्रयत्न आहे. धोरण प्रक्रियेत सुलभीकरण आणण्यासाठी इतर राज्यांतील उपयुक्त कायद्यांचाही अभ्यास करणार असून येत्या काळात महसूल विभागात सकारात्मक बदल आपल्याला पाहायला मिळतील, असं बावनकुळे म्हणालेत.

**सरकारमध्ये योग्य समन्वय**

बहुपक्षीय सरकार समजुतीनं चालवावं लागतं, त्यासाठी समन्वय आवश्यक असतो. महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये समन्वय असून, खातेवाटपामध्येही तो दिसून आला आहे. तसंच पालकमंत्रिपदांचं वाटप करतानाही कोणतीही कुरबूर न होता आमचे नेते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याबरोबर योग्य समन्वय साधून पालकमंत्रिपदांचं वाटप करतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# मराठी पत्रकार परिषद विभागीय सचिवांच्या नियुक्तया जाहीर संभाजीनगर विभागाच्या सचिवपदी रवी उबाळे

पुणे । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या कोअर कमिटीच्या काल पुण्यात झालेल्या बैठकीत परिषदेच्या विभागीय सचिवांच्या नियुक्तयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.. विभागीय सचिवांच्या नियुक्तया करताना तरूणांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



एस.एम.देशमुख बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. बैठकीस विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, मावळते विभागीय सचिव गणेश मोकाशी उपस्थित होते.. प्रारंभी पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले आणि टीमने परिषदेच्या पदाधिकारयांचे स्वागत केले.

मराठी पत्रकार परिषदेच्या संघटनात्मक रचनेत विभागीय सचिवांना विशेष महत्व आहे. आपल्या विभागात संघटनेचं काम वाढविणयाबरोबरच विभागातील जिल्हे, तालुका पत्रकार संघांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्याचं काम ही व्यवस्था करते. परिषदेच्या उपक्रमांची आपल्या विभागात अंमलबजावणी करण्याचं काम विभागीय सचिव पार पाडतात. थोडक्यात विभागीय सचिव हे परिषदेचे कान व डोळे म्हणून कार्यरत असतात.

नवे विभागीय सचिव पुढील प्रमाणे १) मुंबई विभाग : दीपक कैतके, मुंबई फेरनियुक्ती २) पुणे विभाग : पी . पी. कुळकर्णी, सोलापूर **३) संभाजीनगर विभाग : रवी उबाळे, बीड** ४) नागपूर विभाग : प्रदीप घुमडवार, नागपूर ५) अमरावती विभाग : शिखरचंद हुकूमचंद बागरेचा, वाशिम ६) कोकण विभाग : मनोज खांबे, महाड ७) लातूर विभाग : सचिन शिवशेट्टे उदगीर, फेरनियुक्ती ८) नाशिक विभाग : अमोल खरे, मनमाड ९) कोल्हापूर विभाग :चंद्रकांत क्षीरसागर, सांगली. एस.एम.देशमुख यांनी सर्व नवनियुक्त विभागीय सचिवांचे अभिनंदन केलं आहे..

# ...तर सुनावणीशिवाय शिक्षा दिल्यासारखे ठरेल; सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला सुनावले

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

खटला प्रलंबित होऊ नये यासाठी, आरोपींना सुनावणीच्या तारखांना संबंधित ट्रायल जजसमोर प्रत्यक्ष वा व्हर्च्युअल पद्धतीने निश्चितपणे हजर करता येईल, अशा उपाययोजना करा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र सरकारला दिले. मोकाअंतर्गत अटक करण्यात आलेल्या आरोपीचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. त्याला आरोपीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

या आव्हान याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले. अपीलकर्त्याला ट्रायल जजसमोर प्रत्यक्ष किंवा व्हर्च्युअल पद्धतीने हजर न केल्यामुळे खटल्याच्या सुनावणीला जास्त वेळ लागत असल्याचे न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने सांगितले. हे काही एकमेव प्रकरण नसून अशी समस्या अनेक प्रकरणांमध्ये उद्भवत असून हे दु:खद आणि खेदजनक आहे, असेही खंडपीठाने सुनावले.

मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल, महाराष्ट्र राज्याचे गृह सचिव आणि राज्याचे कायदा व न्याय सचिव यांनी एकत्रित बसून आरोपीला प्रत्येक तारखेला खटल्याच्या न्यायाधीशासमोर प्रत्यक्षरित्या किंवा व्हर्च्युअल पद्धतीने हजर केले जाईल, अशी उपाययोजना तयार करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले.

आरोपी हजर नसण्याच्या आधारावर सुनावणी पुढे ढकलू नये, असेही न्यायालयाने बजावले. गेल्या सहा वर्षांत, आरोपीला १०२ तारखांपैकी बहुतेक तारखांना प्रत्यक्ष किंवा व्हर्च्युअल पद्धतीने न्यायालयात हजर केले गेले नाही, हे रेकॉर्डवरून दिसत असल्याचे न्यायालयाने दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

# शेतकऱ्यांचा देशभरात कँडल मार्च; डल्लेवाल यांच्या उपोषणाला पाठिंबा

चंदिगढ । वृत्तसेवा

पंजाबमधील शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल २७ दिवसांपासून बेमुदत उपोषण करत आहेत. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी शेतकरी २४ डिसेंबरला देशभरात कँडल मार्च काढणार आहेत.

शेतमालाला किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी फेब्रुवारीपासून पंजाब-हरियाणा सीमेवर आंदोलन करत आहेत. त्या सीमेवरील खनौरी भागात ७० वर्षीय डल्लेवाल यांनी २६ नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. आता त्यांच्या समर्थनार्थ देशाच्या इतर भागांतील शेतकरीही सरसावले आहेत. डल्लेवाल यांच्या उपोषणाला २६ डिसेंबर यादिवशी एक महिन्याचा कालावधी पूर्ण होईल. त्यादिवशी तालुका आणि जिल्हा स्तरांवर प्रतिकात्मक उपोषण करण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला आहे. केंद्र सरकारने मागणी मान्य करावी, असे आवाहनही शेतकऱ्यांकडून करण्यात आले आहे.

स्वत: डल्लेवाल यांनीही नुकतेच सर्वोच्च न्यायालयाला एक पत्र पाठवले. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याचा आदेश सरकारला द्यावा, अशी विनंती त्या पत्रातून करण्यात आली.

# हिवाळी अधिवेशन संपताच फडणवीस सरकारकडून २३ अधिकाऱ्यांच्या बदल्या

नागपूर । प्रतिनिधी

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर तब्बल २३ अधिका-यांची बदली करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी या काळात नवीन सरकारने कोणते निर्णय घेतले हे सांगितले. दरम्यान, बदल्यांमध्ये काही अधिका-यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

अमरावती विभागाचे उपायुक्त (सामान्य) संजय ज्ञानदेव पवार यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेचे संचालय नंदू बेडसे यांना पदोन्नती देत अल्पसंख्याक विकासच्या आयुक्तपदी छत्रपती संभाजीनगरमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.

सुनील बालाजीराव महिंद्राकर (एससीएस पदोन्नती) अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, लातूर यांची व्यवस्थापकीय संचालक, एम.एस. या पदावर बदली करण्यात आली आहे. रवींद्र जिवाजी खेबुडकर (एससीएस पदोन्नती), उपसभापतींचे खाजगी सचिव, विधान परिषद, मुंबई यांची, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर सहसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय निलेश सागर, लक्ष्मण राऊत, बाबासाहेब बेलदार आणि जगदीश मिनियार यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

माधवी सरदेशमुख यांना पदोन्नती देत मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी, कल्याण-डोंबिवली म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर डॉ. ज्योत्स्ना पडियार यांची आयुक्त, अर्थशास्त्र आणि सांख्यिकी, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अण्णासाहेब चव्हाण यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

गोपीचंद कदम यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बापू पवार यांची सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महेश आव्हाड यांची हाफकिन बायो-फार्मा कॉर्पोरेशन, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात राज्य सरकारतर्फे विशेष सरकारी वकिलांची नेमणूक

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणाने हिवाळी अधिवेशन गाजलं. याप्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

या खून प्रकरणाचा जो कोणी मास्टरमाईंड असेल त्याच्यावर कारवाईचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर ४८ तासात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात कारवाईला वेग आला आहे. हत्या प्रकरण हाताळण्यासाठी राज्य सरकारतर्फे विशेष सरकारी वकिलांची नेमणूक करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडीत काढण्याचे आश्वासन दिले. तर या प्रकरणातील सर्व आरोपींवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा लावण्यात येणार असल्याचे सभागृहात सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या भूमिकेनंतर घडामोडींना वेग आला आहे. विशेष सरकारी वकिल म्हणून बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत कोल्हे वकिल म्हणून काम पाहणार आहे. तर केसच्या संपूर्ण तपासासाठी ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नेमणूक करा,अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी मागणी केली आहे.

# अमित शाह व भाजपा विरुद्ध भव्य निषेध मोर्चा

## गृहमंत्र्यांनी जाहीर माफी मागून त्वरित राजीनामा द्यावा–नसीम खान

**मुंबई । प्रतिनिधी**

आज उत्तर मध्य मुंबई जिल्ह्यातील चांदिवली मतदार संघात माजी मंत्री व प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष मो आरिफ (नसीम) खान यांच्या नेतृत्वात सकल बहुजन समाजाच्या लोकांसोबत भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल लोकसभेत अपमान करणारे वक्तव करणारे भारताचे गृहमंत्री अमित शाह यांच्या विरुद्ध भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.




साकीनाका येथील पेनुनसुला हॉटेल पासून सुरू झालेल्या या निषेध मोर्च्यात अमित शाह यांच्या विरुद्ध जोरदार घोषणा देत निघालेला मोर्चा चांदिवली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून समाप्त करण्यात आला. यावेळी लोकाना संबोधित करताना नसीम खान म्हणाले की, लोकसभेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनादर करीत आक्षेपार्ह विधान करणारे भाजपाचे अमित शाह यांनी सर्व जनते समोर जाहीर माफी मागावी आणि त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी नसीम खान यांनी या मोर्चा दरम्यान केली. नसीम खान पुढे म्हणाले की, देशात भाजपा सरकार आल्यापासून महाराष्ट्रासहित देशातील विविध राज्यात बहुजनावरील अत्याचारांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील परभणी, बीड मधील घटना असो किंवा मुंबईतील पवई येथील जयभीम नगर मधील मागासवर्गीय परिवारांना बेघर केल्याची घटना असो अशा कितीतरी घटना संपूर्ण देशात घडत असून भाजपा सरकार आणि त्यांचे नेते देशातील विविध समाजावर अशा प्रकारचे भाष्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच देशातील १४० करोंड जनतेला लोकशाही पद्धतीने जगण्याचा आणि राहण्याचा अधिकार दिला आहे. भाजपा आणि त्याचे नेते अशाप्रकारचे भाष्य आणि समाजात तेढ निर्माण करीत असतील तर देशातील जनता हे मुळीच सहन करणार असे म्हणत आम्ही अशा सरकार आणि नेत्यांचा जाहीर निषेध करीत आहोत.

या मोर्च्यात साधू कटके, प्रकाश बि-हाडे, गौतम साबळे, शंकर वाघ, योगिराज भोसले, कुमार कांबळे, वजीर मुल्ला, भरत सिंह, शहजादे शेख, मनोज तिवारी, रियाज मुल्ला, संजय उपाध्याय, मूर्तजा अंसारी,आशिष जाधव, नीलेश वाघमारे, रामभाऊ गजाकोश, संजय डावरे, आकाश बागले, अनिल लोंढे, शरद पवार, अशोक पोळ, रमेश बालेश, शहाजी गायकवाड, उत्तम गायकवाड, राकेश बनसोडे, दत्त निकम, अड. विजय कांबळे, अड. कैलाश अगावणे, रामेश्वर दवंडे, सहित सोनू यादव, सुरेन्द्र सिंह, अफताब आलम, सविता पवार, राधिका पवार, सुशीला यादव, परवीन शेख, हाजरा शेख, मिना भालेराव, रिटा सिंह, सुलोचना म्हाळसंघ, कमरुनीसा शेख, फरीदा शेख, मनाली गायकवाड, यांच्यासह हजारोंच्या संख्येत लोक उपस्थित होते.

# शिर्डीतील भाजपाच्या महाअधिवेशनाला दिग्गज नेत्यांची उपस्थिती; चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने भाजपने नियोजनाला सुरुवात केली असून १२ जानेवारी रोजी शिर्डीत महाअधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनाला गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचाराचा शंखनाद या महाअधिवेशनातून करण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.



शनिवारपासून भाजपची सदस्य नोंदणी मोहीम सुरू झाली. विधानसभा निवडणूकीअगोदर पुण्यातील बालेवाडी स्टेडियममधून विधानसभेचे रणशिंग फुंकण्यात आले होते. आता शिर्डीतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचाराचा शंखनाद होईल. या महाअधिवेशनाला १५ हजारांहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहतील. तालुका महामंत्रीदेखील या महाअधिवेशनाला बोलविण्यात येतील. या महाअधिवेशनाच्या निमित्ताने शिर्डीतच पक्षाची प्रदेश पदाधिका-यांची बैठकदेखील होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. भाजपकडून १५ दिवस संघटन पर्व आयोजित करण्यात आले असून सदस्य नोंदणीवर भर देण्यात येईल. खासदार, आमदार, विधानपरिषद सदस्य व प्रमुख पदाधिका-यांना देण्यात आलेले टार्गेट पूर्ण झाले की नाही याचा आढावा घेण्याची जबाबदारी माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांच्यावर देण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.पंकजाताई मुंडे, ना.धनंजय मुंडे यांचा आष्टीत भव्य सत्कार करणार

## पराभवाने खचून जावू नका; संघर्ष करीत करीत राजकारण करतच राहणार-माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात महायुतीचे सरकार सत्तारुढ झाले आहे. बीड जिल्ह्यातून कॅबिनेट मंत्रीपदी ना. पंकजाताई मुंडे व ना.धनंजय मुंडे यांना संधी मिळाली आहे.त्यांचा कोणी सत्कार केला नसला तरी आपण आष्टीत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तारीख घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.पंकजाताई मुंडे,ना. धनंजय मुंडे यांचा लवकरच भव्य सत्कार करु,कार्यकर्त्यांनी पराभवाने खचून जावू नये निवडणुकीत जय पराजय होतच असतो. मी राजकारण सोडणार नाही.लोकांसाठी राजकारण करीतच राहणार आहे.पराभवाने खचून जावू नका; संघर्ष करीत करीत राजकारण करतच राहणारङ्कअसे माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे आयोजित कार्यकर्ता चिंतन बैठकीत बोलताना केले.

माजी आ.भीमराव धोंडे यांनी लोकाग्रहास्तव अपक्ष निवडणूक लढवली परंतु पराभवास सामोरे जावे लागले.आष्टी कार्यकर्ता चिंतन बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे हे होते.याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे,जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, माजी जि.प.सदस्य रामराव खेडकर, रामदास बडे,दशरथ वनवे, ड.रत्नदिप निकाळजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे,माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरूड, जि.प.सदस्य सुरेश माळी,महाराष्ट्र केसरी सईद चाऊस,अशोक दहिफळे, सरपंच दादासाहेब जगताप,माऊली पानसंबळ,हरिभाऊ जंजिरे,माजी





सभापती नियामत बेग,माजी सरपंच बबनराव औटे,पोपटराव सिरसाट, ड.मोहन खेडकर, ड. संभाजी दहातोंडे,देवीदास शेंडगे, महारूद्र खेडकर, राजपल शेंडगे, विठ्ठलराव बन्सोडे, हरिभाऊ जंजीरे, यासीनभाई शेख,माऊली पानसंबळ,अस्लम बेग,अस्ताक शेख,छगन तरटे,दिलीप काळे, अंकुश मुंढे,दादा जगताप,बाबु कदम,दादा विधाते,बाळासाहेब शिंदे, आदिनाथ गवळी,संजय मिसाळ, विष्णू दहिफळे,बाबा गर्जे,कृष्णा गोल्हार,गौतम सावंत,शेख अन्सारभाई,युवराज खटके,रघुनाथ शिंदे,बबन सांगळे,सदा पाटील दिंडे,राजेंद्र खाडे,एकनाथ सानप,ङ्कअभय गर्जे,श्रीराम गर्जे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मस्साजोग येथील सरपंच कै.संतोष देशमुख व परभणी येथील कै.सोमनाथ सुर्यवंशी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की,विधानसभा निवडणुकीत सर्वांनीच खुप कष्ट घेतले परंतु आपल्या कष्टाचे चीज झाले नाही. मला ना.पंकजाताई मुंडे व इतर काही मित्रांनी सांगितले होते की, अपक्ष लढणे अवघड आहे.पण लोकांच्या आग्रहामुळे रिंगणात उतरलो.पण आजच्या काळात अपक्ष लढविणे सोपे नाही. शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मोफत विज पुरवठा योजना,लाडकी बहीण योजना यामुळे मतदान फिरले असावे तसेच ईव्हिएम मशिनचाही संशय आहे. राज्यातील १०० मतदार संघात पराभुत उमेदवारांनी ईव्हीएम विरोधात तक्रार केली आहे. निवडणूक प्रक्रीयेत सुधारणा होणे आवश्यक आहे. भविष्यात ते होईल. पुढच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी हा मतदारसंघ महिलांसाठी राखीव होऊ शकतो. शेतकरी जसा शेवट पर्यंत शेती करतो तसे आपण देखील शेवटपर्यंत राजकारण करू. तसेच सरकारच्या माध्यमातून लोकांचे वैयक्तिक व सार्वजनिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु.ना. पंकजाताई मुंडे यांच्या दोन सभा झाल्या नसत्या तर माझा विजय झाला असता.आपण आरक्षण मुद्यावर वादग्रस्त ठरलो नाही. ङ्कसर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम केले तसे संस्कार माझ्यावर आहेत.नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन दौलावडगाव ते लिंबादेवी हा रस्ता कॉंक्रिट करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.तसे पत्र त्यांना दिले आहे.

युवा नेते अजय धोंडे यांनी सांगितले की,राज्यात ना. पंकजाताई मुंडे यांना चांगले स्थान आहे.त्यांच्या सहकार्यामुळे आपल्याला चांगला फायदा होईल. पराभवाने कोणीही खचून जावू नये.विधानसभा निवडणुकीत कोणी आपले प्रामाणिकपणे काम केले किंवा कोणी केले नाही याची नोंद आम्ही घेतली आहे.भविष्यात चांगले काम करणे सुरुच ठेऊ. कारण प्रत्येक एक दोन वर्षाला वेगवेगळ्या निवडणुका आहेत. झाले गेले विसरून जा,२०२५ या नविन वर्षात नव्या जोमाने कामाला सुरुवात करा.जरी आपला पराभव झाला तरी मतदारसंघातील लोकांच्या

पान दोन वर

# अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय मार्गावर गतिरोधक असतिल तर एचसीपीएल कंपनीला लिंबागणेश येथे गतिरोधक बसविण्यात अडचण काय-डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. मात्र याच मार्गावर लिंबागणेश येथील बसस्थानक आणि भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यास एचसीपीएल कंपनीला काय अडचण आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व हरिओम क्षीरसागर यांनी विचारला आहे.

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असुन शाळेचे मुख्य प्रवेशद्वार अगदी महामार्गाला लागुनच असल्याने शाळा भरताना आणि शाळा सुटल्यानंतर गर्दी असते.याठिकाणी यापूर्वी सुद्धा वारंवार अपघाताच्या घटना घडलेल्या असुन या अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याची मागणी गेल्या २ वर्षापासून पालकांची असुन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २-३ वेळा रास्तारोको आंदोलन करण्यात आलेले आहेत.



**एचसीपीएल कंपनी कडुन प्रशासनाची दिशाभूल - डॉ.गणेश ढवळे**

गेल्यावर्षी दि.४ जानेवारी २०२४ रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३ तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन तहसीलदार सुहास हजारे यांनी याची दखल घेत दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तहसिल कार्यालयात बैठक बोलावली होती.तेव्हा म. रा. म. वि.(मर्या) छत्रपती संभाजीनगर अभियंता महेश देशमुख,नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, एचसीपीएल कंपनीचे कंत्राटदार यांनी राष्ट्रीय महामार्गावरील गतिरोधक बाबत सडक परीवहन व राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि.२९ आगस्ट २०१६ रोजीच्या पत्रकान्वये महामार्गावरील गतिरोधक बाबत सुचना प्राप्त अनुषंगाने गतिरोधक बसविण्यात येणार नाही असे सांगून प्रशासनाची दिशाभूल केली.मात्र बसस्थानक, शाळा, धोकादायक वळण आदी अपघात प्रवण क्षेत्रात ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर बसविण्यात येते. त्याच अनुषंगाने एचपीएम कंपनीने येळंबघाट याठिकाणी गतिरोधक बसविले असुन रात्रीच्या वेळी लांबुन गतिरोधक दिसावेत यासाठी रेडीमेड बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे लिंबागणेश याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे व हरिओम क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

**लिंबागणेशकर आणि पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात**

जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करणा-या एचपीसीएल कंपनीकडून जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करण्यात येत असुन तातडीने लिंबागणेश येथील बसस्थानक, भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आदी अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक न बसवल्यास पुन्हा आंदोलनाचा ईशारा ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे.

# खा.सोनवणेंचा फोन न घेणे एसपींच्या अंगलट; हक्कभंग प्रस्तावावर कारवाईचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

दि.९ डिसेंबर रोजी मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे अपहरण झाले असताना खा.बजरंग सोनवणे यांनी तातडीने तपास व्हावा, यासाठी तत्कालीन पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांना संपर्क करण्याचा शर्तीचा प्रयत्न केला होता. दरम्यान, बारगळ यांनी राजकीय दबावापोटी प्रतिसाद दिला नाही. या प्रकरणी खा.सोनवणे यांनी लोकसभा अध्यक्षांकडे बारगळ याच्या विरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. दि.१८ रोजी हक्कभंग आणि नैतिकता विभागाचे उपसचिव, गृह मंत्रालय यांनी सुजाता सौनिक, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना पत्र पाठवून कारवाईचे निर्देश दिले आहेत.

दि.९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याची माहिती खासदार बजरंग सोनवणे यांना समजली. यानंतर खासदार सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांना फोन केले, मेसेजेस केले. सदरील प्रकरणात तातडीने तपास करून संतोष देशमुख यांची सुटका करावी, यासाठी खा.सोनवणे प्रयत्न करत होते. परंतु पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी कसलाही प्रतिसाद दिला नाही. सदरील आरोपी राजकीय मंडळींशी संबधित असल्याने असे झाल्याचे यातून स्पष्ट होत होते.यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी लोकसभा अध्यक्ष यांच्याकडे परिपूर्ण विशेषाधिकार प्रस्ताव सादर केला. पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी दि.९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख अपहरण झालेले असताना खासदार संपर्क करण्याचे सर्व प्रयत्न करत असताना प्रतिसाद न देणे व त्यानंतर झालेली दुर्दैवी घटना याबाबत तसेच सर्वच यंत्रणांकडून शिफारस होऊनही संसद सदस्यास पुरेशी सुरक्षा प्रदान करण्याचे कामात राजकीय दबावापोटी हयगय करणे, या बाबीमुळे सदस्याचे विशेषाधिकाराचा भंग झाला असल्याचे म्हटले. यामुळे तत्कालिन जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांचे विरोधात हक्कभंग प्रस्ताव सर्व संलग्न पुराव्यासह सादर केला होता. लोकसभा अध्यक्षांनी तातडीने दखल घेऊन केंद्रीय गृहविभागास हे निदर्शनास आणून दिले. यानंतर हक्कभंग आणि नैतिकता विभागाचे उपसचिव, गृह मंत्रालय यांनी सुजाता सौनिक, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना दि.१८ डिसेंबर २४ रोजी पत्र पाठवून कारवाईचे निर्देश दिले आहेत. खासदारांच्या विशेषाधिकाराचा भंग किंवा सदनाचा अवमान केल्याबद्दल दोषी आढळलेल्या व्यक्तीला एक तर कारावास किंवा ताकिद, फटकारणे अशी शिक्षा होऊ शकते. याच बरोबर सदस्यांच्या अवमानासाठी दोन इतर शिक्षा देखील दिल्या जाऊ शकतात. यात निलंबन आणि हकालपट्टीही होऊ शकते. एकूणच अविनाश बारगळ यांनी राजकीय दबावापोटी खासदारांचा फोन न घेणे आता त्यांच्या चांगलेच अंगलट येणार असे दिसत आहे.

# २ रे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी दगडू लोमटे

## १ व २ फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईत होणार मराठी गझल संमेलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी येथील प्रसिद्ध साहित्यिक दगडू लोमटे यांची निवड करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथे हे दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन दि.१ व २ फेब्रुवारी रोजी योगेश्वरी महाविद्यालयाच्या नागापुरकर सभागृहात होणार आहे. महाराष्ट्र भरातून तीनशे गझलकार या गझल संमेलनासाठी उपस्थित राहणार आहेत.

अंबाजोगाई येथील साधना सेवाभावी संस्था यांच्या वतीने अंबाजोगाईत दि. १ व २ फेब्रुवारी रोजी दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन होणार आहे. या निमित्ताने झालेल्या बैठकीत



स्वागत समितीची निवड करण्यात आली. यात स्वागताध्यक्ष म्हणून दगडू लोमटे, कार्याध्यक्ष डॉ.शुभदा लोहिया (राठी), उपाध्यक्ष निशा चौसाळकर, प्रा.मुकुंद राजपंखे, प्रा.शैलजा बरूरे, विद्याधर पांडे, शशिकला घोडके, सचिव गोरख शेंद्रे, सहसचिव दिवाकर जोशी, डॉ.राहुल धाकडे, कोषाध्यक्ष सुनिल जाधव तर स्वागत समिती सदस्य म्हणून कमलाकरराव चौसाळकर, ॲड.अनंतराव जगतकर, अनिकेत लोहिया, डॉ.नरेंद्र काळे, राजपाल लोमटे, बिपिन क्षीरसागर, महेश लोमटे, कल्याण काळे, डॉ.नवनाथ घुगे, लक्ष्मण टाक, एस.बी.सय्यद, संजय सुराणा, ॲड.जयंत भारजकर, अविनाश मुडेगावकर, खाजाभाई यांची स्वागत समितीवर निवड करण्यात आली आहे.

यापुर्वीचे पहिले गझल संमेलन अमळनेर येथे सन २०२३ साली झाले होते. या संमेलनात दुसरे अखिल भारतीय मराठी एल्गार गझल संमेलन अंबाजोगाईत घेण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या घोषणेनूसार साधना सेवाभावी संस्थेने या गझल संमेलनाचे पालकत्व स्विकारले. व अंबाजोगाईकरांच्या वतीने हे गझल संमेलन होणार आहे.

# जीवने साहेब राजस्थानच्या प्रशिक्षण संस्थेला कधी हाकलणार बोगस प्रशिक्षण देऊन बीड जिल्ह्याला कोट्यावधी रुपयाचा चुना

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरावर बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या प्रशिक्षणाची जबाबदारी राजस्थानच्या स्टुडंट्स रिलीफ सोसायटीला देण्यात आली. ज्यांना मराठीचा 'म' कळत नाही त्यांच्यावर ग्रामीण भागातील पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी म्हणजे ही हास्यास्पद बाब आहे. यासाठी जे प्रशिक्षक नेमले तेही प्रशिक्षित नाहीत. थातूरमातूर प्रशिक्षण देऊन आणि बोगस सह्या करून बीड जिल्ह्याला कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या स्टुडन्ट रिलीफ सोसायटीला कधी हकलणार असा सवाल सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

वास्तविक पाहता या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक निवडणे, जागा निश्चित करणे, त्यांना सोयी सुविधा देणे ही जबाबदारी संस्थेची असली तरी यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी

पान दोन वर

**प्रशिक्षणासाठी असलेला जीआर काय सांगतो**

या प्रशिक्षणासाठी राज्य व्यवस्थापन कक्षा पंचायत राज च्या वतीने एक अध्यादेश जारी केलेला आहे. या अध्यादेशानुसार समृद्ध गाव, स्वच्छ गाव, हरित गाव करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायती ला प्रशिक्षण असावे यामध्ये सरपंच आरोग्य पोषण, स्वच्छता व पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष, आरोग्य पोषण स्वच्छता पाणीपुरवठा समितीचे महिला सदस्य, ग्रामसेवक बचत गटाचे प्रतिनिधी, जलसुरक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आदींचा सहभाग असावा. यासाठी जिल्ह्यातून पंधरा अनुभवी प्रवीण प्रशिक्षकांची निवड मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी करावी. यासाठी यशदाचे प्रशिक्षण पूर्ण झालेले असावे.प्रशिक्षणाच्या प्रशिक्षकांचे प्रशिक्षण हे राज्य व्यवस्थापन कक्ष , पंचायत राज ,राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, युनिसेफच्या भागीदारी संस्था या ठिकाणी झालेले असावे. या प्रशिक्षित प्रशिक्षकांची यादी यशदा कडून प्राप्त करून घ्यावी. प्रशिक्षकांची बैठक आयोजित करून त्यांना प्राधान्यक्रम निश्चित करून द्यावा. संख्येनुसार प्रशिक्षकांची निवड करावी. यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी.प. पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोडल अधिकारी म्हणून काम पाहावे. यासाठी प्रशिक्षकांचे एकूण पाच गट तयार करावेत .यामध्ये एक अभियंता, एक भूजलतज्ञ, एक समाज शास्त्रज्ञ किंवा एक प्रवीण प्रशिक्षक असे गट तयार करून याचे प्रशिक्षण पूर्ण करावे. जिल्ह्यामध्ये पाच ठिकाणी प्रशिक्षण वर्ग घेता येतील अशी व्यवस्था करावी. प्रवीण प्रशिक्षकाशिवाय अन्य कोणत्याही प्रशिक्षकाची सेवा यासाठी वापरू नये .तीन दिवसाचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. एका वर्गामध्ये ५० प्रशिक्षणार्थी असावेत .त्याला मेळाव्याची स्वरूप येऊ नये. प्रशिक्षणार्थी साठी वाहन व्यवस्था असावी. निवडलेले गाव हे प्रशिक्षण स्थळापासून ४० किलोमीटरच्या अंतराच्या आत असावे. या ठिकाणी उत्तम दर्जाची व्यवस्था असावी. या प्रशिक्षणा दरम्यान यशदामार्फत प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून द्यावे .ही जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांची राहील. युनिसेफने सुचविलेल्या भागीदारी संस्थांनी हे प्रशिक्षण द्यावे. त्यांना उत्तम भाषा माहीत असावी. यासाठी प्रशिक्षण व्यवस्थित होते की नाही हे पाहण्यासाठी त्रयस्थ संस्थेने भेटी देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणा दरम्यान सर्व बाबींची तपासणी त्रयस्थ संस्थेने करावी. अशा सूचना असतानाही या सूचनाचे पालन केले जात नाही. राजस्थानची ही संस्था सर्व सूचना धाब्यावर बसून थातूरमातूर प्रशिक्षण देऊन कार्यक्रम गुंडाळून कोट्यावधी रुपयाचा मलिदा लाटत आहे. ही संस्था लवकरात लवकर जिल्ह्यातून हद्दपार करावी आणि हे काम महाराष्ट्रातील संस्थेला देण्यात यावे. अशी मागणी जिल्हाभरातून केली जात आहे.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंडला सोडणार नाही; उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिला इशारा

बीड । प्रतिनिधी

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याला सोडणार नाही असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला आहे. यासाठी वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल असे देखील ते म्हणाले आहेत.बारामतीतील नागरी सत्कारात बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणाकडे लक्ष वेधले. यावेळी खासदार सुनेत्रा पवार तसेच आमदार अमोल मिटकरी उपस्थित होते.



बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण हे माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात याबाबत उत्तरे दिले आहेत. याबाबत कडक कारवाईचे आदेश देखील देण्यात आले आहेत. शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत.

बीड मधील या घटनेमुळे आमची देखील शरमेने मान खाली गेली आहे. फाशीची शिक्षा झाल्याशिवाय आरोपींना सोडायचं नाही. जेणेकरून अशा घटनांची पुनरावृत्ती किंवा कोणाचे धाडस होणार नाही. याबाबत न्यायालयीन चौकशी देखील केली जाईल तसेच वेळ पडल्यास फास्टट्रॅक कोर्टातही प्रकरण चालवले जाईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.



वार्षिक मुल्यांकन करून बीड जिल्ह्यातुन अव्वल चे स्थान ळलढ्ल जिल्हा रूग्णालयात बीड फसी इनामदार यांच्या टिमला मा.डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या हस्ते देण्यात आले

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)